# आवाहन

## पर्यटनातून स्वयंरोजगाराकडे......

सिंधुदुर्ग जिल्हयात पर्यटन वृध्दी आणि स्थानिकांना रोजगार मिळावा या दृष्टिकोनातून शाश्वत पर्यटन विकसीत करणेबाबत जिल्हा नियोजन समितीच्या पर्यटन शिर्षाखाली तरतुद करण्यात आलेली आहे. पहिल्या टप्यात सागर किनारे भागातील अविकसीत / कमी विकसीत स्थळांचा समावेश करणेचे प्रस्तावित आहे. यासाठी शासनातर्फे भागीदारी संस्था म्हणून जिल्हा परिषद कार्यान्वयीन यंत्रणा ठेवून, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग, यांना पुर्ण अधिकार देण्यात येत आहेत. सदरची योजना ही स्थानिक इच्छुक नागरीक आणि शासन यांच्या एकत्रित भागीदारीतुन राबविणेची आहे.प्रस्तूत आर्थिक गुंतवणूक ही लाभार्थ्याच्या जागेवर कॉटेज / टेंट्स / तत्सम निवासी संकुलासाठी तात्पुरता आराखडा (Structure) उभारणीच्या माध्यमातनू होईल. शासनातर्फे आर्थिक गुंतवणुकीची जबाबदारी आणि स्थानिक नागरिकांकडून जागा उपलब्धता आणि व्यवस्थापनाची जबाबदारी स्विकारली गेल्यास, निश्चितच दोन्ही बाजुंना फायदेशीर आणि स्थानिक पर्यटन विकासाला पोषक अशी वातावरण निर्मिती होवू शकेल आणि पर्यटन वृध्दिला चालना मिळू शकेल अशी अपेक्षा आहे. यासाठी इच्छुकांना सदर योजनेमध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपले प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग,यांचेकडे **दि.06/01/2017 ते 21/01/2017** पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सादर करावेत.तदनंतर सर्व इच्छुकांची एकत्रित बैठक घेऊन संपुर्ण योजनेची सविस्तर माहिती देण्यात येईल. तथापी, प्रस्तुत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंतिमतः निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय पर्यटन विकास समितीस असतील.

याबाबतची विस्तृत माहीती जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या अधिकृत वेबसाईट (website) **www.zpsindhudurg.maharashtra.gov.in** यावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

आपले विनित,

शेखर सिंह (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प.सिंधुदुर्ग

उदय चौधरी (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी
सिंधुदुर्ग

**<u>सिंधुदुर्ग जिल्हयात पर्यटन वृध्दी आणि स्थानिकांना रोजगार मिळावा या दृष्टिकोनातून शाश्वत पर्यटन विकसीत करणे...</u>**

सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला असताना सुध्दा, जिल्हयातील अनेक पर्यटन स्थळांपैकी केवळ मोजक्याच पर्यटन स्थळांना मोठया संख्येने पर्यटक भेटी देत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे, पर्यटनातून मिळणारे उत्पन्न आणि त्या भागाचा होणारा विकास हा काही पर्यटन स्थळांपूरताच मर्यादित / केंद्रित झाल्याचे दिसून येते. इतर पर्यटन स्थळांमध्ये देखील पर्यटनदृष्टिने विकसीत होण्याची क्षमता असून देखील, काही कारणांमुळे त्या ठिकाणाचे पर्यटन व पर्यायाने स्थानिक विकास मंदावल्याचे दिसून येते.

उपरोक्त बाबींचा विचार केला असता, पर्यटनदृष्टया एखादे स्थळ नावारुपास आणण्यासाठी शासनाच्या गुंतवणुकीसोबतच स्थानिक लोकांचा सहभाग हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्यादृष्टिने अविकसीत / कमी विकसीत पर्यटन स्थळांमध्ये स्थानिक नागरिकांच्या सहकार्यातून पर्यटन वृध्दी तसेच, स्थानिक विकास साधण्याच्या दृष्टिकोनातून शासन आणि स्थानिक नागरिकांनी योग्य अशा भागीदारीतून कार्यवाही केल्यास निश्चितच हे उद्दिष्ट साध्य होवू शकेल.

स्थानिक इच्छुक नागरिक आणि शासन यांची भागीदारी ठरवित असताना, दोन्ही बाजूच्या क्षमतेचा, अनुभवाचा तसेच, कौशल्याचा विचार करुन योग्य भागीदारी होणे आवश्यक ठरते. त्या दृष्टिने शासनातर्फे पर्यटन क्षेत्रात आर्थिक गुंतवणुकीच्या मर्यादा नाहीत आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ सारख्या संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षण कौशल्य आणि पुर्वानुभव देखील उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येते.

तथापी, जिल्हयाचा प्रामुख्याने किनारपट्टीचा विचार केला असता, पर्यटनदृष्टया आकर्षक अशा जागा या प्रामुख्याने खाजगी मालकीच्या असल्याचे दिसून येते. अशा आकर्षक जागा उपलब्ध असताना देखील, स्थानिक नागरिकांना गुंतवणुक आणि मार्गदर्शनाच्या आभावामुळे पर्यटन दृष्टिने जागा विकसीत करणे शक्य होत नाही. सदर बाबींचा विचार करता, शासनातर्फे आर्थिक गुंतवणुकीची जबाबदारी आणि स्थानिक नागरिकांकडून जागा उपलब्धता आणि व्यवस्थापनाची जबाबदारी स्विकारली गेल्यास, निश्चितच दोन्ही बाजुंना फायदेशीर आणि स्थानिक विकासाला पोषक अशी वातावरण निर्मिती होवू शकेल आणि पर्यटन वृध्दिला चालना मिळू शकेल अशी अपेक्षा आहे.

शासनातर्फे होणारी ही आर्थिक गुंतवणुक जिल्हा नियोजन समितीच्या पर्यटन शिर्षाखाली तरतूद करुन, होणे आवश्यक आहे तसेच, पहिल्या टप्यात किनारी भागातील अविकसीत / कमी विकसीत स्थळांचा समावेश करणे प्रस्तावित आहे. यासाठी शासनातर्फे भागीदारी संस्था म्हणून जिल्हा परिषद कार्यान्वयीन यंत्रणा ठेवून, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना याबाबत पुर्ण अधिकारी देणे उचित ठरते. तथापी, प्रस्तुत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंतिमतः निर्णय घेण्याचा अधिकार दिनांक ४ नोव्हेंबर २०१०, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णयाव्दारे गठीत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय पर्यटन विकास समितीस असतील. प्रस्तूत आर्थिक गुंतवणूकही लाभार्थ्याची जागेवर कॉटेज / टेंट्स / तत्सम निवासी संकुलासाठी तात्पुरता आराखडा (Structure) उभारणीच्या माध्यमातनू होईल.